# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा रोड,मुंबई:- ४०० ०३२.

दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.

## आ दे श

क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-०५.- ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने महानगरपालिका, नगर परिषदा / नगर पंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने देण्यास कसूर केली तर अशा उमेदवारास अनर्ह ठरविण्याबाबत अधिनियमात तरतूद केली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीचा खर्च कशाप्रकारे सादर करावा यासंदर्भात क्रमांक-एसईसी-१०९५/१०१/डेस्क-३, दिनांक- ७ फेब्रुवारी, १९९५ अन्वये आदेश दिले आहेत. तसेच उमेदवाराने विविध निवडणुकांमध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादादेखील वेळोवेळी निश्चित करण्यात येते.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त विहित करण्यात आलेल्या खर्चाच्या मर्यादेमधून महत्वाचे राजकीय पुढारी (Star Compaigners) यांच्या प्रचार दौऱ्याचा प्रवास खर्चास सूट देण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४), नागपूर शहर

महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २) च्या कलम ९बी (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(१) निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षांनी त्यांच्या महत्वाचे राजकीय पुढारी (Star Compaigners) यांची यादी संबंधित महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त तसेच नगर परिषद/नगर पंचायती आणि जिल्हा परिषदा/पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावी.

(२) मान्यताप्राप्त नोंदणीकृत राष्ट्रीय, राज्यस्तरीय तसेच इतर राज्यातील राज्यस्तरीय राजकीय पक्ष यांना २० महत्वाचे राजकीय पुढारी यांची यादी सादर करता येईल. तसेच इतर अमान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष यांना १० महत्वाचे राजकीय पुढारी यांची यादी सादर करता येईल.

(३) उपरोक्त राजकीय पक्षांच्या महत्वाच्या पुढाऱ्यांचा (Star Compaigners) निवडणुकीच्या प्रचाराकरिता जाण्याचा तसेच परतीच्या प्रवासाच्या खर्चास संबंधित उमेदवारांच्या निवडणूक खर्चामधून वगळण्यात येईल.

(४) <u>मात्र कोणत्याही उमेदवारास स्वत:च्या प्रभागामध्ये स्वत:चे नाव महत्वाचा राजकीय पुढारी म्हणून घोषित करता येणार नाही.</u> प्रत्येक उमेदवाराने त्याच्या स्वत:च्या निवडणूक प्रभागामध्ये प्रचाराकरीता केलेल्या सर्व प्रवासखर्चाचा समावेश त्याच्या निवडणूक खर्चात होईल.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत:-

१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त व अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने